# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### भूसावळ (जि.जळगाव) येथे वरणगांव पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत

**(१) १७०२ (१५-०१-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूसावळ (जि.जळगाव) येथील वरणगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्राला राज्य शासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र पोलीस दलात निर्माण करावयाच्या एकत्रित पदांच्या दुसऱ्या टप्प्याच्या पदामध्ये जळगांव जिल्ह्यातील भुसावळ येथील वरणगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र, वरणगांवासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचाऱ्यांची पदे प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

### मालवणी मालाड (प) मुंबई येथील अब्दुल हमीन मार्ग, मार्वे रोडच्या मुख्य रस्त्यावरील मुख्य जंक्शनच्या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंग पट्टे, लाईन पट्टे, नो पार्किंग, वाहने सावकाश चालवा मधोमध डिव्हायडर बसविण्याबाबतची मागणी

**(२) १२००१ (०४-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी मालाड (प) मुंबई येथील अब्दुल हमीन मार्गावरील मार्वे रोड वरील मुख्य रस्त्यावरील मुख्य जंक्शनच्या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंग पट्टे, लाईन पट्टे, नो पार्किग, वाहने सावकाश चालवा, मधोमध डिव्हायडर बसविणे या मागण्यासंदर्भात स्थानिक रहिवाशांनी व लोकप्रतिनिधींनी वरिष्ठ पोलीस निरिक्षक परिवहन कार्यालय, मालाड (प) कार्यकारी अभियंता व सहायक आयुक्त, पी/उत्तर विभाग, महानगरपालिका, परिवहन अधिकारी, परिवहन कार्यालय, अंधेरी व वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालवणी पोलीस ठाणे, मालाड (प) मुंबई यांच्याकडे दिनांक १५.१.२०१४, ०६.०३.२०१४, १५.०३.२०१४, ०५.०५.२०१४, ०९.०५.२०१४, १९.०८.२०१४, ०३.०९.२०१४, ०६.०९.२०१४, २५.११.२०१४ व २७.११.२०१४ रोजी वा त्या सुमारास वारंवार मागणी करुनही संबंधित अधिकाऱ्याने दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :**(१) प्रश्नातील नमूद भाग हा दिनांक १५.०७.२०१५ पुवी्र मालाड वाहतूक विभागाअंतर्गत होता. त्यानंतर सदर भाग कांदिवली वाहतूक विभागाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यात आला आहे.

मालाड वाहतूक विभागामार्फत नमूद रस्त्यांवर झेब्रा क्रॉसींग पट्टे, नो पार्किंग, डिव्हायडर बसविणे, सिग्नल बसविणे याबाबत सहायक पालिका आयुक्त, पी/उत्तर विभाग, मालाड (प) त्याचप्रमाणे मुख्य अभियंता (वाहतूक) (बृ.मं.म.न.पा.), वरळी, मुंबई यांच्या कार्यालयाशी तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या कार्यालयाशी सतत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) उपरोक्तप्रमाणे झालेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अब्दुल हमीद मार्गावर दुभाजक बसविण्यात आलेले आहेत. तसेच मार्वे रोड जंक्शन, अब्दुल हमीद रोड येथे दुभाजक बसविण्याच्या कामाचा समावेश प्रस्तावित नविन कामांमध्ये प्राधान्याने करण्याबाबत समावेश प्रस्तावित नविन कामांमध्ये प्राधान्याने करण्याबाबत समावेश करण्यात आलेला आहे. मार्वे रोड व अब्दुल हमीद रोड जंक्शन येथे मालाड अग्निशामक दलासोर झेब्रा क्रॉसिंगचे पट्टे व स्टॉप लाईन चे काम करण्यात आलेले आहे. सदर मार्गावर “नो पार्किंग” व “वाहन सावकाश चालवा” याबाबतचे नामफलक लावण्याबाबत प्राधान्याने कार्यवाही करण्यात येत आहे. मार्वे रोड, खारोडी गांव येथे रस्त्याचे रुंदिकरण प्रस्तावित असल्याने तेथे जागोजागी तात्पुरते लोखंडी ड्रम्स ठेवण्यात आलेले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयासमोरील वाहतूकीस अडथळा होणारी वाहने हटविण्यात आलेली आहेत.

नमूद ठिकाणी वाहतुकीचे नियमन करण्यासाठी एक अधिकारी, दोन अंमलदार व रायडर यांची नियमितपणे नेमणूक करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड आगारातील एस.टी.चा वाहक तिकिट मशीन आणि रोख रक्कमेसह बेपत्ता झाल्याबाबत**

**(३) ४६६५३ (२०-०५-२०१६). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड आगारात कामावर असलेला एस.टी.चा वाहक तिकिट मशीन आणि रोख रक्कमेसह बेपत्ता झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वजिराबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :**(१) व (२) सदरील एस.टी चा वाहक मशीन आणि रोख रक्कमेसह गायब झाल्याची तक्रार प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन वजीराबाद येथे गु.र.नं. २४९/२०१५ भा.दं.वि. कलम ४०९ प्रमाणे दि. ०१/११/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

(३) सदर गुन्ह्याच्या तपासात वाहक तपासात माधव भुजंगा बसवंते हा दिनांक २९/१०/२०१५ रोजी कर्तव्यावर असताना त्याची प्रकृती अचानक बिघडल्यामुळे त्याने त्याचे मूळ गाव कंधार येथे जावून दिनांक ०३/११/२०१५ पर्यंत खाजगी रुग्णालयात दाखल होवून उपचार घेतला. त्याची प्रकृती ठिक झाल्याने दिनांक १५/११/२०१५ रोजी स्वत: एस.टी. आगारात हजर होऊन रुपये ४०००/- व टिकीट मशिन आगारात जमा केली आहे. सदर गुन्ह्याचा तपासत गुन्ह्यातील फिर्यादी यांनी गैरसमजुतीने तक्रार दिल्याचे निष्पन्न झाल्यामुळे सदर गुन्हा 'क' वर्ग समरीकरीता मा.न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**जळगांव शहरासह जिल्हयात घरफोडया, जबरी चो-या आणि आर्थिक गुन्हयांत वाढ झाल्याबाबत**

**(४) ५४५०२ (२३-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात माहे मे, २०१६ मध्ये सुमारे १४ घरफोडया झाल्या असून जिल्हयात घरफोडया, जबरी चो-या आणि आर्थिक गुन्हयांत वाढ झाली असल्यामुळे सदर गुन्हे रोखण्याबाबत जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यांना दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार जळगांव शहरासह जिल्हयात गुन्हे रोखण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :**(१) माहे मे, २०१६ मध्ये जळगांव शहर व परिसरात १४ घरफोडी घटना घडल्या नसून  ८ घरफोडी गुन्हे नोंद आहेत. सन २०१६ मध्ये सन २०१५ चे तत्सम कालावधीचे तुलनेत घरफोडी, जबरी चोरी व आर्थिक गुन्हे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आल्याने दि. १६/०५/२०१६ रोजी जिल्हा घटकात आयोजित केलेल्या गुन्हे बैठकीचे दरम्यान अधिनस्त अपर पोलीस अधिक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पो.स्टे.प्रभारी अधिकारी यांना वाढते गुन्हे व गुन्हेगारी नियंत्रणात ठेवून कायदा व सुव्यवस्था बाधीत होणार नाही याकामी आवश्यक उपाययोजना करणे बाबत मार्गदर्शनात्मक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(२) गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी जिल्हा कार्यक्षेत्रातील तसेच शहर हद्दीतील सर्व कॉलनी परिसरात व व्यापारी / व्यावसायीक दुकान परिसरात सक्तीची रोड पेट्रोलींग सह प्रभावी रात्रगस्त केली जात आहे. कोंम्बिंग नाकाबंदीचे आयोजन करुन क्रियाशील गुन्हेगारांसह वाहन व वाहनांचे दस्तऐवज पडताळणी कार्य केले जात आहे.

गुन्हे व गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवूण कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून समाजकंटक, गुन्हेगारांविरुध्द क्रि.प्रो.को.क. १०७ नुसार २३८२ केसेस, क्रि.प्रो.को.क १०९ नुसार १४८ केसेस, क्रि.प्रो.को.क.११० नुसार २०६ केसेस, म.पो.का.क. ५५/५७ नुसार ३७ प्रस्ताव, म.पो.का.क. १२२ नुसार १८ केसेस, म.दा.का.क. ९३ नुसार ३८ प्रस्ताव MPDA नुसार ७ प्रस्ताव या माध्यमातून प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**धुळे येथील मोहाडी उपनगरात शुभेच्छा फलकांची विटंबना करुन दगडफेक करण्यात आल्याबाबत**

**(५) ५५५७१ (२३-०८-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील मोहाडी उपनगरात शुभेच्छा फलकांची विटंबना करुन दगडफेक झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच धुळे शहर व धुळे तालुक्यात वारंवार दंगली होत असून समाजात तणाव निर्माण करणाऱ्या समाजकंटकांना अटक करुन शांतता निर्माण व्हावी यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी मोहाडी पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द भाग - ५ गु.र.नं. ३५/२०१६ भा.दं.वि. कलम २९५ प्रमाणे दि. १७/०५/२०१६ रोजीगुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आरोपीतांवर भारतीय दंड संहिता व इतर प्रचलित कायद्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येते त्याचप्रमाणे समाज प्रबोधनाकरीता ग्रामीण भागात शांतता कमीटी सदस्य्, मोहल्ला कमीटी सदस्य, प्रतिष्ठीत नागरीक अशांची मिटींग घेण्यात येत असून त्यांना सदरबाबत मार्गदर्शन करण्यात येत असते.

तसेच दोन समाजात तेढ निर्माण करणारे समाजकंटकांचा शोध घेवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन अटक करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## छत्रपती संभाजीराजे साखर कारखान्यात झालेला अपहार

**(६) ५५९२४ (२२-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चित्ते पिंपळगाव (ता.जि.औरंगाबाद) येथील छत्रपती संभाजीराजे साखर कारखान्यांच्या नावे बोगस कागदपत्रे तयार केली असून कारखान्यांची साखर तारण ठेऊन दोन बँकाकडून कर्ज उचलून ५० कोटी रुपयांचा अपहार केला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन क्रांतीचौक, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं. ४७६/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे ३ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींना मा. न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्य शासनाने धोषित केलेल्या नव्या बंदर धोरणाबाबत

**(७) ५६५३४ (२३-०८-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नवे बंदर धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच उक्त धोरणाच्या अनुषंगाने जेएनपीटी व एमटीडीसीतर्फे चालविण्यात येणारी ॲम्फिबिअन बस, रेवदंडा येथे सागरी व्यापारासाठी स्वतंत्र धक्का यासह एकुण १८ हजार कोटी रुपयांच्या बंदर विकासाशी निगडीत प्रकल्पांविषयी करार झाल्याची घोषणा दिनांक १५ एप्रिल, २०१६ रोजी मा. मुख्यमंत्र्यांनी मेरीटाइम इंडिया परिषदेत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :**(१) होय.

(२) १. नवीन बंद विकास धोरणात हरितक्षेत्र बंदरे, बहुउद्देशीय जेट्टी, स्वनियंत्रित धक्के या मुख्य क्षेत्रांसह शिपयार्ड, अंतर्गत जलवाहतूक, कोस्टल इकोनॉमिक झोन या विविध उपक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

२. जेएनपीटी व एमटीडीसीतर्फे चालविण्यात येणारी ॲम्फिबिअन बस ही बंदर विकास धोरणाशी संबंधित बाब नाही.

३. इंडो एनर्जी कंपनीकडून रेवदंडा येथे सागरी व्यापारासाठी कॅप्टीव्ह जेट्टी प्रकल्पाबाबत करार करण्यात आला आहे.

४. सात बंदर विकासकांशी सामंजस्य करार स्वाक्षांकित करण्यात आले आहे. सदर प्रकल्पांसाठी रूपये १४ हजार कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(३) सामंजस्य करार करण्यात आलेल्या सर्व विकासकांकडून पर्यावरण दाखला तसेच इतर संबंधित विभागांकडून दाखले प्राप्त करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनधिकृत पार्कींगमुळे मुंबईत वाहतुकीची कोंडी निर्माण झाल्याबाबत**

**(८) ६३५८६ (२४-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साडेचार हजार खाजगी लक्झरी ह्या बसेस, नियम डावलून रस्त्यावरच बेकायदा पार्किंग करीत असल्यामुळे मुंबईकरांना सक्तीच्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याची बाब मे, २०१६ मध्ये केलेल्या पाहणीत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अनधिकृत खाजगी बसधारकांच्या पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडीवार प्रतिबंध करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) नाही.

रस्त्यावर बेकायदा पार्कींग केलेल्या खाजगी लक्झरी बसेसवर वाहतूक विभागांकडून नियमितपणे कारवाई करण्यात येते.

(२) व (३) अनधिकृत खाजगी बसधारकांच्या पार्कींगमुळे होणारी वाहतुक कोंडी लक्षात घेता त्यास प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. सन २०१५ मध्ये २०,४६९ व सन २०१६ (सप्टेंबर १६ पर्यंत) १२,४६३ याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नौपाडा (ठाणे) येथील शिवाजी नगरात नवसंतोष अपार्टमेंट येथील गजानन आयुर्वेदिक क्लिनिकमध्ये बनावट औषधाचा साठा जप्त केल्याबाबत**

**(९) ६५०१३ (०५-११-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नौपाडा (ठाणे) येथील शिवाजी नगरात नवसंतोष अपार्टमेंट येथील गजानन आयुर्वेदिक क्लिनिकमध्ये मुंबई गुन्हे शाखेने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून बनावट औषधांचा साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही जणांनी बनावट आयुर्वेदिक औषधे देऊन अनेक रुग्णांची फसवणूक केल्याबाबत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली असता गजानन आयुर्वेदिक नौपाडा, ठाणे येथे छापा टाकून ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर दवाखान्यातून आयुर्वेदिक औषधामधील सुवर्ण भस्म, मोती भस्म, चांदी भस्म, हिरा भस्म व पंचरत्न स्पेशल भस्म व पिंपळ तेल आणि काळे खजुर तेल, व्हिजिटिंग कार्ड, आयुर्वेदिक औषधांच्या किंमतीचे स्पायरल बांयडिग मधील पुस्तक, रबरी शिक्के, बनावट औषधे वजन करण्याचा काटा व वजने अशा वस्तु व बनावट आयुर्वेदिक औषधे ताब्यात घेण्यात आलेली आहेत.

फिर्यादीने दिलेल्या तक्रारी अर्जावर त्वरीत कारवाई करुन गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. १८/२०१६ (आजाद मैदान पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४६/२०१६) भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ३३ महाराष्ट्र वैद्यकिय अधिनियम, १९६१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्यात एकूण १० आरोपींना अटक करण्यात येवून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात गुन्हे रोखण्यासाठी सायबर फोर्स व सायबर लॅब उभारण्याबाबत तसेच गुन्हयांचा तपासाठी मनुष्य बळ अपुरे असल्याबाबत**

**(१०) ६५१५२ (१६-०१-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या नुकत्याच प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालानुसार वर्षभरात म्हणजेच २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये राज्यात सायबर गुन्हयांमध्ये २०% वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गुन्हे रोखण्यासाठी सायबर फोर्स व सायबर लॅब उभारण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात सायबर गुन्हयांच्या तपासासाठी अपुरे मनुष्य बळ असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्युरोच्या अहवालानुसार सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये राज्यात सायबर गुन्हयांमध्ये १६.८ टक्के वाढ झाली आहे.

(२) होय, महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्हयात तसेच आयुक्तालयांतर्गत एकुण ४८ सायबर लॅबची उभारणी केली आहे. तसेच सायबर लॅब यांना पोलीस ठाण्याचा दर्जा दिला असून, त्यामुळे तक्रारदारांना साबर लॅब येथे थेट गुन्हा नोंद करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

(३) व (४) सायबर गुन्हयांच्या तपासासाठी नागरी संरक्षण संचालनालयातील १०९ पदे रुपांतरीत करुन, विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर व महिला अत्याचार प्रतिबंध, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर स्थानांतरीत करण्यात आली.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई समुद्रकिना-यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या दोन फायबद बोटींना आग लागल्याबाबत.**

**(११) ६५३३६ (१७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई समुद्र किना-यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या दोन फायबद बोटींना दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास अचानक आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई पोलीस दलांनी अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळीला अटक केल्याबाबत**

**(१२) ६५४२४ (१७-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अंमली पदार्थमुक्त मोहिमेतील पथकाने अंमली पदार्थ विकणाऱ्या एका महिलेस सी.बी.डी. बेलापूर येथून दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच
मुंबई, ठाणे, कल्याण, उल्हासनगर या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शहरांमधून होत असलेल्या अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. या परिसरात अंमली पदार्थाची तस्करी होत असल्याच्या बातमीवरुन गुन्हे शाखा, ठाणे यांनी कार्यवाही करुन, वर्तकनगर पोलीस ठाणे, कळवा पोलीस ठाणे, ठाणेनगर पोलीस ठाणे, शिळ-डायघर पोलीस ठाणे इत्यादि ठिकाणी गुन्हे दाखल करुन २२ आरोपींवर गुन्हे दाखल करुन, अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

(३) अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडून एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत वेगवेगळया अंमली पदार्थची विक्री करणे, बाळगणे, वाहतुक करणे तसेच सेवन करणे इत्यादी विरोधात उपरोक्त प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. ड्रगचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी,

२०१५ पासून “ड्रग्ज फ्रि कॅम्पस” हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्यावतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवडा साजरा करण्यात येतो. या वर्षी सदर पंधरवडयादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागपूर शहरामध्ये रूग्णवाहिकेतून १ कोटी रूपयाचा गांजा जप्त करण्यात आल्याबाबत

**(१३) ६५६६३ (१७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरामध्ये रूग्णवाहिकेतून ७०० किलो गांजा पोलीसांमार्फत माहे सप्टेबर, २०१६ रोजी जप्त करण्यात आला असून सदर गांज्याची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात १ कोटी रुपयांहून अधिक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परराज्यातून नागपूर शहरामध्ये अशा प्रकारच्या अंमली पदार्थांची मोठया प्रमाणात वाहतूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
नागपूर येथे दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजित किंमत रु.७५,४१,४४०/- इतकी आहे.
(२) नाही, हे खरे नाही. सदरहू साठा नागपूर शहरामध्ये रुग्णवाहिकेतून जप्त करण्यात आला असून तो गुजरात राज्यात जात होता.
(३) या संदर्भात कळमना पोलीस ठाणे येथे, कलम २०, २९, ८ (क) अंमली पदार्थ कायद्यान्वये दिनांक २.९.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाटोदा (जि. बीड) येथिल पोलीस वसाहतीची झालेली दुर्दशा

**(१४) ६६१३९ (१७-०१-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटोदा (जि. बीड) येथील पोलीस वसाहतींची दुर्दशा झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वसाहतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :**(१) व (२) होय, याबाबत पोलीस विभागाकडून सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाटोदा यांच्या सोबत पत्रव्यवहार केला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील रहेजा स्कुल ऑफ आर्ट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मंत्रालयासमोर केलेल्या आंदोलनात पोलीसांनी मारहाण केल्याबाबत**

**(१५) ६६२१२ (०७-०२-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (मुंबई) येथील रहेजा स्कुल ऑफ आर्ट महाविद्यालयाने शैक्षणिक शुल्काच्या नावाखाली आकारलेली जादा रक्कम परत करण्यासाठी सदर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मंत्रालयासमोर दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंदोलन करणाऱ्या १८ ते २० वयोगटातील विद्यार्थ्यांना पोलीस उपायुक्त श्री.मनोजकुमार शर्मा यांनी बुक्क्यांनी मारहाण केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एक वरिष्ठ पोलीस अधिकारीच विद्यार्थ्यांना मारहाण करत असल्याचे पाहून पोलीसांनी विद्यार्थ्यांच्या केसांना पकडून पोलीस व्हॅनमध्ये कोंबले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) रहेजा कॉलेज विद्यार्थी संघटनेकडून करण्यात येणा-या चिल्लर फेको आंदोलनाच्या अनुषंगाने त्यांचे पदाधिकारी यांना पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे जमावबंदी आदेशाबाबत अवगत करुन फौ. दं. प्र. संहिता कलम १४९ अन्वये नोटीस देण्यात आली होती. तसेच त्यांच्या मागण्यांकरीता आझाद मैदान येथे बंधपत्र भरुन आंदोलन करण्याबाबत समज दिली होती. तथापि, दि. २४.०८.२०१६ रोजी नविन प्रशासन भवन येथून अंदाजे ३० ते ४० विद्यार्थांच्या समुहाने चिल्लर पैशाची उधळण करत मंत्रालय गेट समोरील सिग्नलवर घोषणाबाजी करुन आंदोलन केले. मंत्रालय परिसरात आंदोलन करण्यास मनाई असल्याचे मा. न्यायालयाचे आदेश असल्याची जाणीव करुन देण्यात आली होती.परंतू, त्यांनी आंदोलन

थांबविले नसल्याने आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन पोलीस वाहनातून मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणेस आणुन त्यांचेविरुद्ध स्थानिक गु. र. क्र. १४/२०१६ कलम ३७(१) सह कलम १३५ म.पो.कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवळी-सावंगी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील महिलांचा तलावात बुडून झालेल्या मृत्युबाबत**

**(१६) ६६२३६ (१६-०१-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवळी-सावंगी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील हरतालिका पुजेसाठी तलावावर गेलेल्या सहा महिला बुडाल्याची घटना दिनांक ४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) दि.०४.०९.२०१६ रोजी ११.०० चे सुमारास सावंगी शिवारातील पुष्पा नदीवर बांधलेल्या बंधाऱ्याजवळील खोल पाण्यात गोराई पुजनानिमित्त आंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरलेल्या सहा महिलांपैकी एक महिला पाण्यात घसरुन बुडाली असता तिला वाचविण्यासाठी आलेल्या इतर पाच महिला अशा एकूण सहा महिलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.
    याप्रकरणी पोलीस स्टेशन हिंगणा येथे मर्ग क्रमांक ३३/२०१६, कलम १७४ जा.फौ.अन्वये दाखल करुन मर्ग समरी क्र. ६३/२०१६ अन्वये सहायक पोलीस आयुक्त, एमआयडीसी विभाग, नागपूर शहर यांना पाठविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथे लाच घेताना कृषि विस्तार अधिकाऱ्यास केलेली अटक**

**(१७) ६६५२१ (१६-०१-२०१७). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथे अपंग शेतकऱ्यांचे शेतीपंपाचे प्रकरण मंजूर करण्यासाठी लाच घेताना कृषि विस्तार अधिका-यास अटक केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.मनोहर जनार्दन जाधव, विस्तार अधिकारी, कृषि विभाग, पंचायत समिती, वाडा, जि.पालघर (वर्ग-३) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारदाराकडून लाच स्वीकारतांना रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार वाडा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११/२०१६ गुन्हा करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी आरोपी लोकसेवक श्री.मनोहर जनार्दन जाधव यांना दि.१०.०८.२०१६ पासून निलंबित केले आहे.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील नगरपालिका लिपिकास लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(१८) ६६६९७ (१७-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे घरफाळा कमी करुन देतो असे सांगून त्यासाठी दहा हजार रुपयांची लाच घेतांना नगरपालिकेचा लिपिक शशिकांत महादेव बागी यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) लोकसवक शशिकांत महादेव बागी यांस तक्रारदार यांचेडून लाच घेतांना रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी जि.कोल्हापूर येथे गु.र.नं. २७४/२०१६ गुन्हा दाखल करण्यात आला असुन मुख्याधिकारी, इचलकरंजी नगर परिषद यांनी लोकसेवक शशिकांत महादेव बागी यांना दि.१४.०९.१६ पासून सेवेतून निलंबित केले आहे.

---

**बोल्हेगाव (जि.अहमदनगर) येथील बांधकामाच्या ७/१२ उतारा देण्यासाठी लाच घेताना नगर तलाठी कार्यालयात कोतवालाला पकडण्यात आल्याबाबत**

**(१९) ६६८४४ (१७-०१-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोल्हेगाव (जि.अहमदनगर) नगर-मनमाड मार्गावरील शिवारातील गट क्र. ७८/१ मधील भूखंड क्र.४ येथे घराचे बांधकामाच्या ७/१२ उतारा देण्यासाठी रुपये ४५०० रक्कमेची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाने नगर तलाठी कार्यालयातील कोतवालाला पकडल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) लोकसेवक संदीप बबन गाडेकर, कोतवाल सजा बोल्हेगांव तलाठी कार्यालय, अहमदनगर यांना तक्रारदाराकडून लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार एमआयडीसी पोलीस ठाणे, अहमदनगर येथे गु.र.नं. ३१००/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन मा.विशेष न्यायालयात दिनांक १४.१२.२०१६ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी लोकसेवक मनोहर जनार्दन जाधव यांना दि.१०.०८.२०१६ पासून निलंबित केले आहे.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील बालगृहामधील मुलीवर अत्याचार करण्यात आल्याबाबत**

**(२०) ६६९८१ (१७-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी व वाठार येथील मुलींवरील झालेल्या अत्याचाराच्या घटना नुकत्याच घडल्या असतांनाच पोलिस निरीक्षकाने व एका बालगृह अधिक्षिकेच्या मुलाने बालगृहातील मुलीवर अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अत्याचाराच्या निषेधार्थ 'माहेर' संस्थेच्या वतीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी मूक रॅली काढून निषेध व्यक्त करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१७) :**(१) बालगृह अधिक्षिकेच्या मुलाने बालगृहातील मुलीवर अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर घटनेबाबत माहेर संस्थेच्या वतीने मुक रॅली काढून निषेध व्यक्त करण्यात आलेला नाही.

(३) फिर्यादी मुलीने तिच्यावर बालगृहात राहत असतांना बालगृहाची अधिक्षिकाचा आरोपी मुलगा याने दि.२४.०६.२०१७ ते २७.०७.२०१६ पर्यंत अनेक वेळा बलात्कार केल्याबाबत एमएलसी जबाबावरुन पोलीस ठाणे नवामेंढा येथे गुरनं ४०१/१६ कलम ३७६ (क) सह कलम ३,४,६,८,१२,१७, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपघात विमा खटल्यामधील गैरप्रकारांची चौकशी करण्याबाबत

**(२१) ६७१३४ (०२-०२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपघात विम्यातील खटल्यामधील गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलला न्यायालयीन चौकशी करण्याच्या दिलेल्या निदेशानुसार निवृत्त न्यायाधिशांनी केलेल्या चौकशीचा अहवाल महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलकडे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरप्रकारात पोलीस, डॉक्टर, वकील, विमा सर्वेअर, विमा अधिकारी सहभागी असल्याची बाब चौकशी दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरप्रकाराला जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) :**(१) महाराष्ट्र व गोवा बार कॉन्सिल कडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार यवतमाळ, हिंगोली, परभणी व वाशिम या चार जिल्ह्यातील अपघात विम्यातील खटल्यातील संदर्भामध्ये गैरप्रकाराबाबत बार कॉन्सिल ऑफ इंडिया कडे अधिकार देण्यात आले होते. त्याप्रमाणे बार कौन्सिल ऑफ इंडियाने निवृत्त जिल्हा न्यायाधीशंची एक सदस्यीय चौकशी समितीद्वारे चौकशी अहवाल बार कौन्सिल ऑफ इंडिया कडे पाठविण्यात यावा असे निर्देश बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाला दिले त्याप्रमाणे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाने निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्रीमती. विद्या खरे यांची यवतमाळ जिल्ह्यातील प्रकरणाकरिता व श्री.बी.डी. कापडणीस यांची परभणी, वाशिम व हिंगोली जिल्ह्यातील अपघात विमा खटल्या संदर्भात चौकशी करण्याकरिता एक सदस्यीय अशा २

समित्या स्थापन केल्या त्याप्रमाणे दोन्ही न्यायाधीशांनी आपआपला ओपनीय अहवाल बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकड सादर केला. श्रीम.विद्या खरे यांचा दि.२९/७/२०१६ रोजी व श्री.बी.डी.कापडणीस यांचा दि.१०/१०/२०१५ रोजी सदरहू अहवाल बंद पाकिटात बार कौन्सिल बॉफ इंडियाकडे पाठविण्यात आला. त्या अहवालात काय लिहिले आहे हे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाला माहिती नाही कारण सदरहू अहवाल गोपनीय स्वरुपाचा असून बंद पाकिटात प्राप्त झाला व ते पाकिट लघडण्याचे अधिकारी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाला नव्हते. त्यामुळे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाने तसेच बंद पाकिट बार कौन्सिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचेकडे पाठविले.

(२) सदरहू अहवालामध्ये दोषी कोण आहे कोण नाही याबाबत बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाला सदरहू अहवाल वाचलेला नसल्यामुळे व तो बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाकडे उपलब्ध नसल्यामुळे सांगता येणार नाही. तसेच एखाद्या वकिलाबद्दल गैरप्रकाराची तक्रार आल्यास बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाला ॲडव्होकेट ॲक्ट १९६१ च्या कलम ३५ नुसार शिस्तपालन समितीद्वारे प्रकरण पंजीबध्द करुन चालवावे लागते व या समितीला दिवाणी न्यायालयाचे संपूर्ण अधिकार आहेत.

(३) १ व २ हाच याबाबतचा खुलासा समजण्यात यावा.

(४) यास खुलाश्याची आवश्यकता नाही.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसीतील प्रोबेस इंटरप्रायझेस कंपनीतील स्फोटाबाबत**

**(२२) ६७३८८ (१६-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि. ठाणे) एमआयडीसी परिसरातील मानपाडा रोड, स्टार कॉलनी जवळ, प्रोबेस इंटरप्रायझेस कंपनीमध्ये दिनांक २६ मे, २०१६ रोजी झालेल्या स्फोटाप्रकरणी शासनाने घोषित केलेली मदत अद्यापपर्यंत मिळाली नसल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर नुकसानग्रस्तांपैकी किती जणांना किती नुकसान भरपाई दिली आहे व अद्यापपर्यंत किती जणांना नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आलेली नाही,

(३) असल्यास, उर्वरीत नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२३-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) या दुर्घटनेमध्ये मयत झालेल्या व्यक्तींच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहायता निधितून मंजुर करण्यात आलेल्या रु.२४ लाख अर्थीक सहायातून ९ मृत व्यक्तींच्या वारसांना (दुर्घटनेस सकृतदृष्टया जबाबदार असलेल्या भोगवटदाराच्या कुटुंबातील ३ मृतांच्या वारसांना वगळून) प्रत्येकी रु. २ लाख याप्रमाणे रु. १८ लाख आर्थीक सहाय्य अदा करण्यात आले आहे.

सदर स्फोटामध्ये जखमींच्या वैद्यकीय उपचाराच्या रकमेची प्रतीपुर्ती करण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु. २६,५१,९१०/- रकमेपैकी २१५ जखमींना रु.२४,५९,४९०/- इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले आहे. मेडीक्लेम कंपन्यांद्वारे रु.१,११,६२२/- इतक्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. जखमी व्यक्तींच्या आस्थापनेमार्फत रु.१,,४९,४३१/- इतक्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. ज्या जखमी व्यक्तींची पूर्ण नावे, पत्ते व भ्रमणध्वनी क्रमांक अप्राप्त आहेत त्यांचा तपशिल प्राप्त झाल्यानंतर त्यांना रु.४४,९९९/- इतक्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

(३) सदर अपघातग्रस्त कारखाना परिसरातील इमारती इत्यादींच्या नुकसानीबाबत एकूण २६६० पंचनाम्यांमध्ये नमूद रु.७,४३,२७,९९०/- एवढया रकमेचा जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाने पाठविलेला प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील पोलीस ठाण्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत**

**(२३) ६७८४४ (१७-०१-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील पोलीस ठाण्याचा प्रमुख अधिकारी महिन्याचा हप्ता ठरवून मागतांना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) लोकसेवक सर्जेराव बाबुराव गायकवाड, पोलीस निरीक्षक व विष्णू रमेश शिंदे, पोलीस नाई शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी यांना पंचासमक्ष तक्रारदाराकडून लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडल्याने त्यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी येथे गु.र.नं. २८५/२०१६ अनवये गुन्हा दाखल करण्यात आला असुन श्री.गायकवाड, पोलीस निरीक्षक यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर यांनी दि.२६.९.१६ रोजी निलंबित केले असून श्री.शिंदे, पोलीस नाईक यांना पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी दि.२७.९.२०१६ अन्वये सेवेतुन बडतर्फ केले आहे.

---

**मुंबईत सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षाच्या कालावधीत**
**३६४० आत्महत्यांच्या घटना घडल्याबाबत**

**(२४) ६७९०१ (११-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एका संस्थेने माहिती अधिकारात मिळविलेल्या माहितीनुसार सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षाच्या कालावधीत मुंबईत ३६४० आत्महत्यांच्या घटना घडल्या असून त्यात २३०४ (६३.२ टक्के) पुरुषांचा समावेश असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आत्महत्या रोखण्यासाठी माणसांचा एकाकीपणा दूर करणे, त्याला मानसिक आधार देणे, त्याला आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त करणे यासाठी शैक्षणिक संस्थेपासून आरोग्य संस्थेपर्यंत सर्वांकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०४-२०१७) :**(१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१३ ते २०१५ या कालावधीत एकुण ३६४० व्यक्तींनी आत्महत्या केली असून त्यापैकी २३०४ पुरुष, १३३३ स्त्रीया व ३ तृतीयपंथी यांनी आत्महत्या केल्या आहेत.

(२) व (३) आत्महत्या रोखण्यासाठी ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती आत्महत्येचा प्रयत्न करीत असलेल्या घटनेबाबतची माहिती पोलीस नियंत्रण कक्षास वा पोलीस ठाण्यास प्राप्त होताच संबंधीत ठिकाणी पोलीस अधिकारी स्वत:हून जावून किंवा गस्तीवरील मोबाईल वाहने पाठवून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस समोपचाराने विश्वासात घेतले जोते. तो करीत असलेल्या कृत्याबाबतचे परिणाम त्याला समजावून सांगून त्याने आयुष्याबाबत सकारात्मक विचार करावा याबाबत समुपदेशन केले जाते. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचे राहते ठिकाणी कार्यरत पोलीस कर्मचारी नियमीत भेट देऊन त्यांच्या अडचणींचे तात्काळ निवारण करण्यात येते. त्यांचा एकटेपणा दुर करुन त्यांना आयुष्याप्रती सकारात्मक ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. पोलीस ठाणेस कौटूंबिक कलहाच्या तक्रारी प्राप्त झाल्यास व त्या गुन्हेगारी स्वरुपाच्या नसतील तेव्हा अशा कलहाचे निवारण करणेकरीता पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून समुपदेशन व मार्गदर्शन करण्यात येते. त्याचबरोबर बृहन्मुंबईतील बहुतांश निर्मनुष्य ठिकाणी व आत्महत्येकरीता कुप्रसिध्द अशा ठिकाणांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील विमानतळाचे विस्तारीकरण करण्याबाबत**

**(२५) ६७९१३ (१०-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे कायमस्वरुपी विमानसेवा सुरु होण्यासाठी आवश्यक असलेल्या विमानतळ विस्तारीकरणातील अडथळे दूर करुन विमानसेवा सुरु करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(२) असल्यास, उक्त विमानसेवा कायमस्वरुपी सुरु होण्यास अद्यापही विलंब होत असल्याने उद्योजक तसेच बाहेरील व्यापारी व्यवसायासाठी येण्यास निर्बंध आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विमानसेवा सुरु होण्याकरिता किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१), (२) व (३) राष्ट्रीय विमान वाहतूक धोरणाअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या “Regional Connectivity Scheme” या योजनेनुसार राज्यातील विमानतळांचा विकास करण्यासाठी राज्यशासन, केंद्र शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यामध्ये दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर विमानतळाचा समावेश करण्यात आला आहे.

कोल्हापूर येथील विमानतळ विकासाचा अंदाजे रु.२७४.०० कोटींचा आराखडा भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी तयार केला असून विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरु करण्याची तयारी दर्शवली आहे. तसेच या आराखड्यातील अंदाजे खर्चाच्या २५ ते ३० टक्के खर्चाची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी असे कळविले आहे. भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी सूचित केल्यानुसार एकूण खर्चाच्या ३० टक्के खर्च करण्यासाठी राज्य शासनाने सहमती दर्शवली आहे व याअनुषंगाने पुढील कार्यवाही होत आहे.

---

## मुदखेड (जि.नांदेड) येथील सीमा सुरक्षा दलाच्या कॅम्पसमधील चंदनाची दोन झाडे चोरल्याबाबत

**(२६) ६८०४७ (११-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड (जि.नांदेड) येथील सीमा सुरक्षा दलाची सुरक्षा यंत्रणा भेदून चंदन चोरांनी कॅम्पसमधील चंदनाची दोन झाडे तोडून नेली असून या प्रकरणी मुदखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंदन तस्करांनी यापूर्वीही नांदेड येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या निवासस्थानी असलेले चंदनाचे झाड चोरले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मुदखेड गु.र.नं. १०५/२०१६ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे ही खरे आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन शिवजीनगर नांदेड येथे गु.र.नं. १२८/२०१३ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर दोन्ही गुन्ह्यात चोरीस गेलेला मुद्देमाल व आरोपींतांचा शोध घेण्यासाठी नॉंदेड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना बिनतारी संदेशवहनाद्वारे, अभिलेख केंद्रास ई मेल फॅक्स द्वारे माहिती देण्यात आली आहे. मोडस ऑपरेटींग ब्युरोकडून सजेशन प्राप्त करुन घेवून सजेशन प्रमाणे तपास केला. तसेच संशयितांच्या घराच्या झडत्या घेण्यात आल्या आहेत. परंतू आरोपी न मिळून आल्याने गु.र.नं. १२८/२०१३ हा गुन्हा "अ" समरी मंजूर करुन सदर गुन्हा कायम तपासावर ठेवण्यात आला आहे. तसेच गु.र.नं. १०५/२०१६ या गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणी प्रकरणी कायदा करण्याबाबत**

**(२७) ६८५३४ (१०-०१-२०१७). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणीसंदर्भात कायदा करण्यासाठी दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी राज्यभर लेखनी बंद आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७)** :(१) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणी संदर्भात कायदा करण्यासाठी दि. २२.०९.२०१७ रोजी राज्यभर लेखणीबंद आंदोलन प्रस्तावीत होते. परंतु, त्यानंतर सदरचे आंदोलन रद्द करण्यात आले.

(२) सदर प्रकरणी भारतीय दंड संहितेतील अतित्वात असलेल्या कलम ३३२ व कलम ३५३ मध्ये सुधारणा करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्ह्यातील दिवा, मुंब्रा, कळवा आंबिवली व भिवंडीमध्ये १६ हजाराहून अधिक बांगलादेशी लोक वास्तव्य करित असल्याबाबत

**(२८) ६९००१ (११-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवा, मुंब्रा, कळवा आंबिवली व भिवंडीमध्ये १६ हजाराहून अधिक बांगलादेशी लोक परवानगीशिवाय वास्तव्य करित असल्याचे अलिकडेच केलेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बांगलादेशीयांना परत पाठविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :**(१) व (२) सदर प्रकरणी परवानगी शिवाय वास्तव्य करत असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरुध्द ठाणे शहर व ठाणे ग्रामीण पोलीसांमार्फत विशेष मोहिम राबवून सन २०13 पासून अद्याप पर्यंत ९१३ अनधिकृत वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरुध्द कारवाई करण्यात आलेली असून, त्यापैकी शिक्षा भोगलेल्या एकुण ४८७ बांगलादेशी नागरिकांना त्यांच्या मायदेशी परत पाठविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्हा पोलीस वसाहतींची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) ७०१८४ (१७-०१-२०१७). श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पोलीस वसाहतींची दुरवस्था लक्षात घेऊन शासनाने सन २०१३-१४ मध्ये मुख्यालयातील ११० सदनिकांच्या दुरुस्तीसाठी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे सदर कामांची निविदा प्रक्रियाच पूर्ण होऊ शकली नसल्यामुळे हा निधी नवी मुंबई, कळंबोली येथील पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी वापरण्यात आला असून रायगड पोलीस मुख्यालयातील मोडकळीस आलेल्या सदनिकांचे काम होऊ शकले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हा पोलीस वसाहतींची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस मुख्यालय, अलिबाग येथील ११० शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी रु. ८१.६२ लक्ष निधी दि. १४.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चंदगड (जि.कोल्हापूर) येथील पोलीस कर्मचारी वसाहतीची दुरूस्ती करण्याबाबत

**(३०) ७११७१ (११-०१-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथील पोलीस कर्मचारी वसाहतीची दुरूस्ती करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी माहे दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी व यापूर्वीही अनेक वेळा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक २५.११.२०१३ अन्वये सदर दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १४.०३.२०१७ अन्वये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील विविध कारागृहातील कैद्यांना राज्यमाफी तसेच लिखाणासंबंधी गृह विभागाकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणांबाबत

**(३१) ७१२७२ (११-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त (समता वर्ष) राज्यातील विविध कारागृहातील कैद्यांना सन १९९७ च्या युती शासनाच्या निर्णयानुसार राज्यमाफी तसेच तुरुंगातील कैद्यांच्या लिखाणासंबंधी मा.प्रधान सचिव, गृह विभाग यांचेकडे प्रलंबित प्रकरणावर तातडीने परवानगी मिळणेबाबत लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजी राज्याचे मुख्य सचिव यांचेकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०४-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त (समता वर्ष) राज्यातील विविध कारागृहांमध्ये शिक्षा भोगत असणाऱ्या बंद्यांना शासनामार्फत राज्यमाफी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धनज ( जि.वाशिम) येथील शेतकऱ्यांकडून लाच घेताना कनिष्ठ अभियंता, सहाय्यक लाईनमन व खाजगी वायरमन यांना अटक केल्याबाबत**

**(३२) ७२३९६ (१६-०१-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धनज (जि.वाशिम) येथील शेतकऱ्यांकडून कनिष्ठ अभियंता, सहाय्यक लाईनमन व खाजगी वायरमन यांनी विद्युत खांबाच्या कामांसाठी २० हजार रुपयांची लाच मागितली असतांना अमरावती एसीबी पथकाने सापळा रचून दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) आरोपी लोकसेवक जगदीश श्रीराम ढुमणे, कनिष्ठ अभियंता, श्री.उमेश लहुजी राऊत, वरिष्ठ तंत्रज्ञ, मुख्य अभियंता यांचे कार्यालय, अकोला परिमंडळ यांना खाजगी वायरमन श्री.मते यांच्या मार्फतीने दि.२६ जुलै, २०१६ च्या सुमारास तक्रारदाराकडून लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडल्याने तीनही आरोपींविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार पोलीस स्टेशन, धनज जि.वाशिंम येथे गु.र.नं. १४३/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. तसेच श्री.ढुमणे, कनिष्ठ अभियंता व श्री.राऊत, वरिष्ठ तंत्रज्ञ, यांना मुख्य अभियंता, अकोला परिमंडळ यांनी दि.३०.७.१६ अवये शासकीय सेवेतून निलंबित केले आहे.

---

**डोंबिवली (जि.ठाणे) येथील कुमारी स्नेहल हिंदूराव गवारे हिच्या खूनाबाबत**

**(३३) ७२५७८ (११-०१-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील पांडूरंग वाडी परिसरातील निनाद सोसायटीत तिस-या मजल्यावर राहणा-या कुमारी स्नेहल हिंदूराव गवारे या महाविद्यालयीन विद्यार्थीनीच्या खूनासंदर्भात डोंबिवली पो.स्टे. येथे गु.र.क्र.१६७/२००७, भा.दं.वि.स. कलम ३०२ व २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू खुनास ९ वर्षे होवूनही अद्यापही गुन्हा तपासाधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्हयाचा तपास पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत व तपास पूर्ण होण्यास अजून किती कालावधी अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :**(१), (२) व (३) होय.

सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस असयुक्तालयातील परिमंडळ-३ मधील डोंबिवली पोलीस स्टेशन येथे दि.२०.०७.२००७ रोजी गु.र.क्र. १६७/०७ भा.दं.वि. ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आरोपीस अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने दि.२६.०५.२०१० रोजी जामीन मंजूर केला आहे. तथापि, अटक आरोपीत हिरेन भरत राठोड याने सी.आर.पी.सी. १६९ प्रमाणे मुक्त करणेसाठी मा.न्यायालयात अहवाल सादर केला होता.

तथापि, सदरहू प्रकरणात मा.न्यायालयाने सी.आर.पी.सी. १५६ (३) प्रमाणे पुन्हा तपास करणेबाबत सूचना दिल्याने सदर गुन्हयाचा अधिक तपास करण्यात येत आहे.
(४) सदर गुन्हयाचा अधिकाधिक कसुन तपास करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्हयातील १० हून अधीक पोलीस कॉन्स्टेबल व अधिकारी लाच प्रकरणामध्ये पकडले गेल्याबाबत**

**(३४) ७३०७४ (११-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील गैरव्यवहाराला प्रतिबंध बसविण्याचे आवाहन पालकमंत्री यांनी करूनही जिल्हयातील १० हून अधिक पोलीस कॉन्स्टेबल व अधिकारी लाच प्रकरणामध्ये पकडले गेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे. ११ लाच प्रकरणांमध्ये ११ पोलीस कर्मचारी व २ पोलीस अधिकारी अशा एकुण १३ जणांना लाच प्रकरणांमध्ये रंगेहाथ पकडले आहे.

यापैकी पोलीस निरीक्षक वर्ग-१ च्या अधिकाऱ्यास विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी तसेच ११ पोलीस नाईक/हवालदार/सहायक पोलीस निरीक्षक (वर्ग-२) यांना पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी निलंबित केले असून एका पोलीस नाईक यास बडतर्फ केले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मालाड (पूर्व) येथील नडीयादवाला तबेलाची जागा बळकावण्याच्या वादातून दोन गटात दंगल झाल्याबाबत**

**(३५) ७३८२३ (२०-०४-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पूर्व) येथील नडीयादवाला तबेल्याची जागा ताब्यात घेण्याच्या वादावरुन दिनांक २५ डिसेंबर, २०१६ रोजी दोन गटात भीषण दंगल झाली असून दिंडोशी पोलीस दोन्ही गटांविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत कोणतीच प्रतिबंधात्मक कारवाई करीत नसल्याने तेथील नागरीकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दंगली पूर्वी ४ दिवसांपासून तेथे गुंडाच्या हालचाली सुरू असतानाही पोलीसांचे याकडे दुर्लक्ष झाले असून दंगलीत डब्बल बोअरच्या बंदुकीतून हवेत दोन-तीन वेळा गोळया झाडण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांकडून कोणतीही कारवाई झालेली नसल्याबाबत राष्ट्रीय भ्रष्टाचार आणि अपराध निवारक परिषदेचे अध्यक्ष मोहन कृष्णन यांनी आयुक्त, बृहन्मुंबई पोलीस तसेच मा.मुख्यमंत्री आदीकडे माहे डिसेंबर च्या शेवटच्या आठवडयात एका सविस्तर निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :** (१) दोन्ही गटातील फिर्यादींनी एकमेकाविरुद्ध दिलेल्या फिर्यादीवरुन दिंडोशी पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ९८४/२०१६ व गु. र. क्र. ९८६/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या तेथे कोणतीही तणावग्रस्त परिस्थिती नाही.

(२) सदर गुन्ह्याच्या तपासात साक्षीदारांनी घटनास्थळी डबल बोअर बंदुकीतून हवेत गोळीबार झाल्याचे सांगितले आहे. त्यावरुन गुन्ह्याच्या कलमात भा. ह. का. कलम ३, २५, २७ या कलमांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) लेआऊट क्र. १८ ते २४, पहाडी गाव, मालाड (पुर्व), मुंबई ही जागा मे. अमल्गमेटेड बिल्डींग कॉर्पोरेशन यांचे मालकीची असून त्या जागेवर पत्र्याचे कुंपण बांधण्यासाठी सदर

संस्थैने महानगरपालीके कडून रीतसर परवानगी घेतली होती. सदर ठिकाणी पत्र्याचे कुंपन बांधण्याचे काम सुरु असतांना तेथील नाडीयादवाला तबेला कंपाऊन्ड मधील तबेला मालकांशी वाद होऊन दोन गटात दंगल झाली. त्याबाबत दोन्ही गटांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिंडोशी पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ९८४/१६ भादवि कलम १४३, १४४, १४५, १४७, १४८, १४९, ३३६ सह ३, २५, २७ भा.ह.का. हा गुन्हा व गु. र. क्र. ९८६/१६ भादवि कलम १४३, १४५, १४७, १४८, १४९, ३३६, ४२७, ५०६ (२) सह ३, २५, २७ भा.ह.का. अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदर दोन्ही गुन्हातील ३ मुख्य आरोपींवर फौ.दं.प्र.सं कलम १०७ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असून सदर गुन्ह्यांचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळोजा औद्योगिक (जि.रायगड) परिसरात खेरणे येथील गोडावूनमध्ये कामगारांना मिळत असलेला तुटपुंजा पगार**

**(३६) ७४०५७ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा औद्योगिक (जि.रायगड) परिसरात खेरणे येथील एका गोडावूनमध्ये काम करणा-या तब्बल १५० हून अधिक कामगारांना व्यवस्थापनाच्या दहशतीमुळे तुटपुंज्या पगारावर १० वर्षापासून काम करावे लागत असून त्यांचे आर्थिक शोषण केले जात असल्याच्या तक्रारी कामगारांनी तळोजा पोलिस ठाण्यात दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार संबधित गोडावून व्यवस्थापनांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१७-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयामार्फत सदर आस्थापनेस भेट देऊन व्यवस्थापनाविरुध्द, विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारीत करण्यात आले आहेत. सदर शेऱ्यांची पूर्तता न केल्यामुळे आस्थापनेविरुध्द पनवेल येथील न्यायालयामध्ये खटले दाखल करण्यात आले आहेत. सदर खटल्याबाबत पुढील सुनावणी दिनांक १७.७.२०१७ रोजी आहे. तसेच उभय पक्षांना चर्चेसाठी पाचारण करुन त्यांच्यात तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि, वेतनवाढीबाबत उभय पक्षांमध्ये एकमत न झाल्याने समझोता होऊ शकलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण भवनातील जातपडताळणी कार्यालयातील स्टेनोला लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याबाबत

**(३७) ७४३१५ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण भवनातील जातपडताळणी कार्यालयातील स्टेनो दिनेश सोनावणे यांना ३०००० रुपयांची लाच घेताना लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे युनिटने दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास अटक करुन त्यांच्याविरुध्द सीबीडी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपी हे अन्य कोणत्या व्यक्तीकरीता लाच घेण्याचे काम करीत होते याबाबतचा तपास करण्यात आला आहे काय,

(३) तसेच त्याच्या कार्यालयाची, घराची व लॉकरची झडती व तपासणी करुन चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, चौकशीमध्ये ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त संपत्ती आढळून आली आहे काय, तद्नुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

आरोपी लोकसेवक श्री.दिनेश पुंडलीक सोनोने उच्च श्रेंणी लघुलेखक (वर्ग-२) जिल्हा जातपडताळणी समिती, ठाणे यांना तक्रादाराकडून रुपये ३०,०००/- ची लाच स्वीकारतांना दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी रंगेहाथ पकडण्यात आल आहे. त्याचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार सीबीडी बेलापूर, पोलीस स्टेशन येथे दि.२४.०१.२०१७ रोजी गु.र.क्र. ०५/२०१७ दाखल करण्यात आला असून श्री.सोनोने यांना दि. २४.०१.२०१७ रोजी शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(२) आरोपी लोकसेवक श्री.दिनेश पुंडलीक सोनोने हे कोणत्या व्यक्तीकरिता लाच घेण्याचे काम करिता होते याबाबतचा तपास सुरु आहे.

(३) आरोपी लोकसेवक श्री.दिनेश पुंडलीक सोनोने यांच्या राहत्या घराची दि. २३.०१.२०१७ रोजी झडती घेण्यात आली असून घरझडतीत आक्षेपार्ह काहीही आढळून आले नाही. त्यांचेविरुध्दच्या दाखल गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घरगुती कामगारांसाठी किमान वेतनदर निश्चित करण्याबाबत

**(३८) ७४३२६ (२१-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरगुती कामगारांसाठी सात महिन्यांपूर्वी किमान वेतनदर निश्चित करण्याचा निर्णय होऊनही प्रशासकीय अनास्थेमुळे घरगुती कामगारांचे वेतन दरपत्रक कागदावरच राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती कामगारांच्या किमान वेतनदर निश्चितीबाबत शासनाने तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१७-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत अनुसूची-१ मध्ये "घरेलू कामगारांचा रोजगार" चा समावेश करण्याबाबत दिनांक ३०.१२.२०११ रोजी मसुदा अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे.
"घरेलू कामगारांचा रोजगार" या अनुसूचित रोजगाराच्या किमान वेतनाचे दर कोणत्या पध्दतीने ठरविण्यात यावे, याचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील पोलीस दलामधील ९३ हजार अस्थायी पदे स्थायी करण्याबाबत**

**(३९) ७४६८७ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस महासंचालकांच्या अखत्यारितील ७६ हजार व मुंबई पोलीस आयुक्तांच्या अखत्यारितील १७ हजार पदे अस्थायी असून सदर अस्थायी पदांना माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची महत्वाची जबाबदारी असलेल्या पोलीस दलातच शिपायापासून ते जिल्हा पोलीस उप अधिक्षक व सहायक पोलीस आयुक्ता पर्यंतच्या सुमारे ९३ हजार पदांना दरवर्षी मुदतवाढ देण्यात येत असल्याने त्यांच्यामध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अस्थायी पदे स्थायी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) :**(१) राज्यातील पोलीस महासंचालकांच्या अखत्यारितील ७६,६९४ पदे व मुंबई पोलीस आयुक्तांच्या अखत्यारितील १७,००४ पदे अस्थायी असून सदर अस्थायी पदांना दिनांक २८ फेब्रुवारी,२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि वित्त विभागाने दिनांक १०.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना दिलेल्या प्राधिकारानुसार सदर अस्थायी पदांना दिनांक ३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

पोलीस दलातील सदर अस्थायी पदांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येत आहे.

(३) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २१.०६.२००६ अन्वये ज्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा पुर्ण केला आहे व आढाव्याअंती निश्चित केलेल्या आकृतीबंधास मुख्य सचिव समितीची मान्यता घेवून शासन निर्णय निर्गमित केला आहे, अशा प्रशासकीस विभागांना त्यांच्या अधिपत्याखालील एकुण पदांच्या ८० टक्के पदे कायम करण्यास काही अटींच्या अधिन राहून अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयातील पदांचा आढावा घेवून निश्चित केलेला सुधारीत आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध घटक कार्यालयातील पदांचा आढावा घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी प्रत्येक जिल्हयात नेमण्याबाबत

**(४०) ७४८९४ (२०-०४-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वर्षाला साधारण १०० च्या आसपास मोठे आर्थिक गुन्हे विविध पोलिस ठाण्यांमध्ये नोंदवले जात असून सदर गुन्हयांमधील रकमेची व्याप्ती साधारण: अडीच हजार कोटीपर्यंत असून नॅशनल स्पॉट एक्स्चेंजचा जवळपास साडेपाच हजार कोटींचा घोटाळा मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेने निदर्शनास आणल्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी प्रत्येक जिल्हयात नेमण्यास गृह विभागाने मान्यता दिली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप किती जिल्हयात आर्थिक गुन्हे शाखेसाठी स्वतंत्र उपअधिक्षक अधिकारी नेमण्यात आले आहेत तसेच, राज्यातील सर्व जिल्हयात किती कालावधीत आर्थिक गुन्हे शाखेसाठी उपअधिक्षक नेमण्यात येणार आहे,

(३) अद्याप, याबाबत कार्यवाही केली नसल्यास त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) गृह विभाग शासन निर्णय दिनांक ०५.०१.२०१७ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या विविध घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेली पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त यांची पदे ३२ जिल्ह्यामधील आर्थिक गुन्हे शाखेकरीता स्थानांतरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) विविध जिल्ह्यात आर्थिक गुन्हे शाखेसाठी उक्तप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या ३२ पदांपैकी ०७ पदांवर पोलीस उपअधीक्षक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या पोलीस उपअधीक्षक संवर्गाच्या एकूण ७०२ मंजूर पदांपैकी १८९ पदे रिक्त असून सदर पदांपैकी पदोन्नती कोट्यातील १५६ पदांवर पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती येथे शेतकऱ्यांनी काढलेल्या मोर्चावर केलेला लाठीचार्ज**

**(४१) ७४९४१ (२१-०४-२०१७). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे नोटबंदीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार मदत व इतर काही मागण्यांबाबत शेतकऱ्यांनी दिनांक ४ जानेवारी २०१७ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर काढलेल्या शेतकरी मोर्चावर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शेतकरी मोर्चावर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१७)** :(१) व (२) दिनांक ०५.०१.२०१७ रोजी प्रहार संघटनेच्यावतीने नांगर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, परंतू, दिनांक ०४.०१.२०१७ रोजी सायंकाळी विधानपरिषद पदवीधर मतदार संघाची आचारसंहिता लागल्याने विभागीय आयुक्त, अमरावती व जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या आदेशान्वये मोर्चा आयोजकांना मोर्चास दिलेली परवानगी आचारसंहितेमुळे रद्द करण्यात आल्याचे लेखी कळविण्यात आले होते. तरीसुद्धा प्रशासकीय आदेश झुगारुन मोर्चा काढण्यात आला. सदर मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय येथे आला असता त्यांना रोखण्यासाठी लावलेल्या लोखंडी बॅरीकेट्स मोर्चेक-यांनी ट्रॅक्टरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न केला. तसेच, जमावातील मोर्चेक-यांनी बॅरीकेट्स तोडून पोलीसांना धक्काबुक्की व दगडफेक केली त्यात ७ पोलीस अधिकारी व ८ पोलीस कर्मचारी जखमी झाले. सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याने मोर्चेक-यांना रोखण्यासाठी पोलीसांनी प्रथम “वरुण” या वाहनाने जमावावर पाण्याचा मारा केला, तसेच दंगा नियंत्रण पथकातील कर्मचा-यांकडून ४ गॅस हवेत उडविण्यात आले व ४ हॅन्डग्रेनेड जमावाच्या दिशेने फेकण्यात आले. परंतू, जमाव ऐकण्याच्या स्थितीत नव्हता व पोलीसांवर तिव्रतेने हल्ला करीत

होता. कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. पोलीसांवर हल्ला करणे व सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केल्याबाबत मोर्चेक-यांविरुद्ध गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. १६/२०१७ भादवी कलम १४३, १४७, १४८, १४९, ३०७, ३३२, ३३३, ३३६, १८८ सह कलम १३५, १३६ मपोका, ३, ४ सार्वजनीक संपत्ती नुकसान कायदा ७ क्री. लॉ. अमेन्डमेंट ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेबाबत

**(४२) ७५१५२ (२१-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांपैकी शासन मान्य नसलेल्या कोणत्याही संघटनेला कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणतेही निवेदने किंवा शिष्टमंडळ पाठविण्याचा अधिकार नसून अशा संघटनेची निवेदने किंवा पत्रव्यवहाराची दखल घेऊ नये असा आदेश शासनाने काढल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये किती व कोणत्या मान्यताप्राप्त संघटना असून सदर मान्यताप्राप्त संघटनेकडून आलेली निवेदने, पत्रे व शिष्टमंडळाशी झालेली चर्चा याबाबत शासन किती कालावधीत उत्तर देणार याबाबत शासनाने काही नियमावली तयार केली आहे काय, असल्यास, सदर नियमावलीचे स्वरुप काय असेल,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०५-२०१७) :**(१) होय.

(२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ अंतर्गत राज्यातील शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेत्तर) २६० शासन मान्यता प्राप्त संघटना आहेत.

शासन मान्यता प्राप्त संघटनेकडून आलेली निवेदने, पत्रे व शिष्टमंडळाशी झालेली चर्चा याबाबत किती कालावधीत उत्तर देणार अशा विषयाबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील एका खासगी शाळेत शिकणा-या सात व आठ वर्षीय मुलींना मारहाण करुन शाळा वाहन चालकाने लैंगिक अत्याचार केल्याबाबत

**(४३) ७६७२७ (२१-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील निजामपुरा परिसरात असलेल्या चाचा नेहरू हायस्कुल या खासगी शाळेत शिकणाऱ्या सात आणि आठ वर्षीय मुलींना मारहाण करुन शाळा वाहन चालकाने लैंगिक अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) :**(१) होय.
(२) सदर प्रकरणी आरोपीविरुध्द निजामपुरा पोलीस स्टेशन गु.र.नं.l २०१/२०१६ भादंवि कलम ३७६, ३२३, ५०६ सह पोक्सो कायदा कलम ८, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुकंपाधारक उमेदवारांना विनाअट नोकरीत नियुक्ती देण्याबाबत

**(४४) ७७८०७ (२१-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाकडे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी १ ऑक्टोंबर, २०१६ रोजीपर्यंत १०,३६६ अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी प्रतिक्षेत असणारे अनेक जण वयाची अट पूर्ण न करुन शकल्याने नोकरीपासून वंचित झाले असून प्रतिवर्षी एकूण पदांच्या ५ टक्के पदे अनुकंपा यादीतील व्यक्तीमधून भरण्याच्या निर्णयामुळे प्रतीक्षा यादीतील हजारो उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याची शक्यता कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने अनुकंपाधारक उमेदवारांना विना अट नियुक्ती देण्याच्या मागणीसाठी माहे मार्च, २०१६ मध्ये मुंबई येथे आमरण उपोषणही केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

दिनांक २२.०८.२००५ नंतर अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षा सूचीवर सप्टेंबर, २०१६ अखेर एकूण १०,३६६ उमेदवार होते.
(२) हे खरे नाही.

शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.अकंपा १०१४/प्र.क्र.३४/आठ, दि. ०१.०३.२०१४ नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मधील प्रती वर्षी रिक्त होणाऱ्या ५% मर्यादेमध्ये वाढ करून

ती १०% इतकी करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये एक वर्षानंतर फेरआढावा घेण्याबाबतची तरतूद होती. त्या अनुषंगाने शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. अकंपा-१२१५/ प्र.क्र.४७/आठ, दि. २८.१०.२०१५ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% असलेल्या मर्यादेस दि. ०१.०३.२०१५ पासून पुढे दि. २८.०२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) होय, अनुकंपाधारक उमेदवारांनी अनुकंपा नियुक्ती विना अट करण्यात यावी यासाठी दि. ०७.०३.२०१७ पासून आमरण उपोषण केले होते.

(४) व (५) शासन निर्णय, क्र. अकंपा-१२१७/प्र.क्र.४६/आठ, दि. ०३.०५.२०१७ अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांच्या १०% असलेल्या मर्यादेस दि.०१.०३.२०१७ पासून पुढे दोन वर्ष (दि.२८.२.२०१९ पर्यंत) मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

**शाहूपूरी (जि.कोल्हापूर) येथील मंडळ अधिकारी व त्यांचे सहकारी यांना सात-बारा उतारा देण्याकरिता लाच घेतांना अटक केल्याबाबत**

**(४५) ७७८६३ (०६-०६-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूपूरी (जि.कोल्हापूर) येथे खरेदी केलेली शेतजमिन नावावर करुन सात-बारा उतारा देण्याकरिता १० हजार रुपयांची लाच घेतांना मंडळ अधिकारी श्रीमती स्मिता कुपटे व त्यांचे दोन सहकारी यांना दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

मौजे हेर्ले ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथील मंडळ अधिकारी श्रीमती स्मिता कुपटे यांना त्यांच्या दोन सहकाऱ्यांमार्फत रुपये १०,०००/- ची लाच स्वीकारतांना दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

(२) व (३) आरोपी लोकसेविकास श्रीमती स्मिता कुपटे व त्यांचे दोन सहकाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार हाकणंगले पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे दि.०६.०१.२०१७ रोजी गु.र.क्र.०६/२०१७ दाखल करण्यात आला आहे.

तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी मंडळ अधिकारी श्रीमती स्मिता कुपटे यांना दि.१२.०१.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

---

**शिरोली (जि.कोल्हापूर) येथील सांगली फाटा परिसरात सुरु असलेल्या ओपन बारवर कारवाई करण्याबाबत**

**(४६) ७७८८७ (२१-०५-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोली (जि.कोल्हापूर) येथील सांगली फाटा परिसरातील काही खाद्यपदार्थाच्या गाड्या व शेतकरी पंपाकडील सेवा मार्गावर सायंकाळ नंतर ओपन बार सुरु असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी तेथील शेतकरी व महिला प्रवाशांनी संबधिताकडे माहे डिसेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार अद्यापपर्यंत किती जणांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील इंदिरा गांधी सरकारी वैद्यकीय कॉलेज आणि हॉस्पीटलच्या अधिष्ठाताला लाच घेताना अटक करण्यात आल्याबाबत**

**(४७) ७८३५३ (०८-०६-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), अॅड. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री. संजय केळकर (ठाणे), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड), श्री. विजय औटी (पारनेर), श्री. राजु तोडसाम (अर्णी), श्री. प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय कॉलेज आणि हॉस्पीटलच्या अधिष्ठाता डॉ.मिनाक्षी इंदुप्रकाश गजभिये व विजय उदीतनारायण मिश्रा यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने औषध वितरकाकडून १५ हजार रुपयांची लाच घेताना अटक केल्याची माहिती दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच राज्यात लाच घेण्याच्या प्रमाणात वाढ झाली असून त्यास आळा बसण्यासाठी शासनामार्फत कोणती प्रभावी भूमिका घेण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) या प्रकरणी पोलीस स्टेशन, तहसिल, नागपूर शहर येथे दि.१६.१.२०१७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) राज्यातील लाचखोरीला आळा घालण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत-

लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत www.acbmaharashtra.net हे मोबाईल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच टोल फ्री क्र. १०६४ ही हेल्पलाईन, Whats app No.९९३०९९७७०० फेसबुक वर www.facebook.com/MaharashtraACB या नावाने अकाऊंट, www.acbmaharashtra.gov.in या वेबसाईट विविध माहिती उपलब्ध करण्यात येत आहे. एसीबीच्या कार्यपध्दतीसंबंधी रेडीओ, दूरदर्शनवर परिसंवाद आयोजित करण्यात येतात. व त्याद्वारे जनजागृती करण्यात येते. एसीबीचे अधिकारी त्यांच्या अधिकार क्षेत्रात आठवडे बाजार, गर्दीच्या ठिकाणी एसटी स्टॅण्ड, मंदिर, कॉलेज, रेल्वेस्टेशन येथे जावून एसीबी संबंधी जनजागृती करतात. तसेच सर्व शासकीय कार्यालयाच्या दर्शनी भागावर एसीबी संबंधी फोन नं., हेल्पलाईन नं. प्रदर्शित केले जातात. जनजागृतीसाठी सर्वत्र शहर व गावात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची माहिती असलेले पोस्टर/स्टीकर/मेल आयडी दर्शनी भागवार लावण्यात येतात. acbwebmail@mahapolice.gov.in यावर तसेच ब्युरोमधील कार्यरत परिक्षेत्रीय मेल आयडीवर तक्रार केली जाऊ शकते.

---

**जलसंपदा विभागाचे माजी मुख्य अभियंता आणि सह सचिव सुरेश पाटील यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईबाबत**

**(४८) ७८६१३ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाचे माजी मुख्य अभियंता आणि सह सचिव सुरेश पाटील यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करून कोल्हापूर, सांगली, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांमधील त्यांच्या स्थावर मालमत्तेवर छापे टाकल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) आरोपी लोकसेवक सुरेश पाटील, माजी मुख्य अभियंता आणि सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी परीक्षण दि. २७.०१.१९८० ते दि. ३१.०५.२०१२ या कालावधीत त्यांच्या ज्ञात स्त्रोतांपेक्षा ६८.११% इतकी अपसंपदा धारण केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द तसेच त्यांच्या पत्नी श्रीमती विद्या सुरेश पाटील व मुलगा श्री.विक्रांत सुरेश पाटील यांचेविरुध्द शाहुपुरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर येथे दि. १७.११.२०१६ रोजी लाचलुचपत प्रतिबंध कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड (जि.यवतमाळ) येथे नविन उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय सुरु करणेबाबत**

**(४९) ७८७५५ (२१-०४-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे नविन उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या आस्थापनेवरील पुसद उपविभागाचे विभाजन करुन उमरखेड येथे नवीन उपविभागीय कार्यालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावावर उपस्थित विविध मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांकडून माहिती मागविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाघबीळ गावातील (जि.ठाणे) एका अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याबाबत**

**(५०) ८०९७० (२१-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील वाघबीळ गावातील एका अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुलाच्या पालकांमार्फत कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपास करुन आरोपीवर बाल अत्याचार प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हे नोंदवण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) :**(१) होय.
(२) होय.

(३) फिर्यादीच्या मुलावर आरोपीने दि.२४.१२.२०१६ रोजी अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केला म्हणून दि.२७.१२.२०१६ रोजी फिर्यादीने खबर दिल्यानुसार कासारवडवली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.I ३२९/२०१६ भादंवि कलम ३७७ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम कलम ३, ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आले असून, आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.